वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १९ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# चाऊसांच्या हातून दादागिरीचे 'वस्त्रहरन'

## माजलगावात घराणे शाहीचा 'सूर्यास्त' लवकरच..!

## दोन दिवसात गुन्हेगारीचे पितळ आम्ही उघडे करू – बाबुराव पोटभरे



माजलगाव , (दिव्य न्युज):– स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचं बिगुल वाजलेलं असतांना माजलगावात मात्र नगरपरिषदेच्या अर्ज छाननी प्रक्रियेत गोंधळ उडाल्याच चित्र पहायला मिळालंय.अजित पवार गटाचे विद्यमान आमदार यांनी प्रशासनावर दबाव आणल्याचा आरोप माजी नगरअध्यक्ष सहाल चाऊस यांनी माध्यमांशी बोलतांना केला.



Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## सहाल चाऊस ढसाढसा रडले

माजलगावच्या आमदारांनी दिलेल्या त्रासामुळे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस ढसाढसा रडताना दिसले. ते म्हणाले आम्ही जगावं की नाही? आम्ही बीडला प्रमाणपत्रासाठी अर्ज केला तर त्यांनी तिथे अधिकाऱ्यांवर दबाव टाकला. आम्ही जिंतूर सुनेचा प्रमाणपत्रासाठी अर्ज केला. तिथेही अधिकाऱ्यांवर त्यांनी दबाव टाकला. पाच टर्म आमदार राहीलेल्या व्यक्तीला हे शोभते का? माजलगावच्या जनतेला माझी कळकळीची विनंती आहे की त्यांनी शहराची या जाचातून सुटका करावी, असं आवाहन देखील माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी केले.

## माजलगावची टक्केवारीतून सुटका करा –बाबुराव पोटभरे

कितीही आपटू आपटू घेतली तरी काही फरक पडणार नाही. आमचं शंभर नंबरी सोनं आहे. भैय्या नगराध्यक्ष होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. मी वकीलांचे, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे आभार मानतो. दुर्दैव आहे माजलगावचे की आमदार साहेब कारण नसताना सुकाळपासून तहसील कार्यालयात येऊन बसले आहेत. अधिकाऱ्यांवर त्यांनी दबाव टाकण्याचा प्रयत्न पाच टर्मच्या आमदारांना इथं येऊन बसावं लागतं हे दुर्दैवं आहे. आमदाराच्या गुन्हेगारीचं पितळ दोन दिवसात उघडं करणार आहे, असा इशारा बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे यांनी दल केलाय. शिवाय माजलगावकर जनतेनं टक्केवारीतून शहराची केला. आम्ही फॉर्म भरला त्याचं दिवशी आमचा विजय झाला. घेण सुटका करावी, असं आवाहन देखील पोटभरे यांनी केलंय

बीड जिल्ह्याच्या केंद्रस्थानी मानला जाणाऱ्या माजलगाव नगरपरिषदेच्या वर्तुळात शरद पवार गटाचे नेते सहाल चाऊस यांनी महेरीन शिफा बिलाल चाऊस या आपल्या सुनेचा अर्ज दाखल केला होता परंतु शिफा बिलाल यांचे जात प्रमाणपत्र खोटे असल्याचा दावा आमदार प्रकाश सोळंके समवेत जयसिंह सोळंके यांनी केला.तहसील कार्यालयात सूचक मोदक अनुमोदक शिवाय कोणालाही परवानगी नसतांना आपल्या सहकाऱ्यांसमवेत येऊन प्रशासनावर दबाव आणत सत्तेची गुंडगिरी सुरू असल्याची चर्चा माजलगाव शहरभर होतांना दिसतेय.लोकसभा विधानसभेच्या काळात चाऊस यांच्या नेतृत्वात माजलगाव तालुक्यातून मतदानाच्या रुपात होणाऱ्या विरोधाने आमदार प्रकाश सोळंके यांना पक्षश्रेष्टींकडून मिळालेल्या तंबीने विद्यमान आमदाराची दमछाक होतांना दिसतेय अशी माहिती सूत्राकडून मिळाली आहे.

माझं शहर माझी जहागीरदारी समजणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांच्या गुन्हेगारीचं पितळ आम्ही येत्या दोन दिवसात माध्यमासमोर आणू. माजलगाव शहराला गुन्हेगारी,टक्केवारी व घराणेशाहीतून मुक्त करण्यासाठी आम्ही सर्व एक मताने लढू व जिंकू ही असा इशारा बहुजननेते बाबुराव पोटभरे यांनी दिला.

माजलगावच्या दादागिरीलां आता घरचा आहेर दाखवण्याची वेळ आलीय. येत्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत माजलगावची जनता या जाचाला कंटाळून प्रकाश सोळंके यांना मताच्या रूपातून योग्य धडा देईल यात शंका नाही.हम करे सो कायदा या तत्वावर चालणानाऱ्या विद्यमान आमदाराने ज्या प्रकारे प्रशासनावर दबाव आणत शिफा बिलाल चाऊस यांचे जात प्रमाणपत्र खोटे असण्याचा दावा केला होता त्याला आम्ही संविधानिक मार्गाने हाणून पाडलंय. येत्या निवडणुकीत दादागीरीचा सूर्यास्त झाल्या शिवाय राहणार नाही.. सहाल चाऊस

## फाईट होणार टाईट, तिरंगी लढतीतील तिन्ही नगराध्यक्षांचे अर्ज वैध

**कमळाच्या डॉ. ज्योती घुमरे, घड्याळाच्या प्रेमलता पारवे, तुतारीच्या स्मिता वाघमारे यांचे उमेदवारी अर्ज ठरले वैध**

बीड, (दिव्य न्युज):– बीड नगर पालिका निवडणूकीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट या पक्षातच ▸▸ पान २ वर




## छाननी झाली, मनधरणीसाठी उमेदवारांना तीन दिवसांचा वेळ

### उमेदवारांची धाकधूक वाढली, २१ नोव्हेंबरपर्यंत आणखी उलथापालथ

बीड, (दिव्य न्युज):– जिल्ह्यातील बीड, माजलगाव, गेवराई, अंबाजोगाई आणि धारूर नगरपरिषदेची निवडणुक होत आहे. निवडणुकीच्या प्रक्रियेला आता खऱ्या अर्थाने वेग आला आहे. मंगळवारी उमेदवारी अर्जाची छाननी पूर्ण झाली असून, पक्षांतर्गत समन्वय व मनधरणीच्या माध्यमातून उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यासाठी २१ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. छाननीत अपात्र ठरलेले अर्ज मागे घेण्यासाठी २५ मोव्हेंबरपर्यंत वेळ आहे. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी अंतिम उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांची घोषणा करण्यात येणार आहे. या सर्व प्रक्रियेनंतर २ डिसेंबर रोजी मतदान पार पडेल. तर ३ डिसेंबरला मतमोजणी होऊन नगराध्यक्ष आणि नगरसेवक ▸▸ पान २ वर



## माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदेसह प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी निलंबित



### बीड शिक्षण विभागात आर्थिक घोटाळा, दलालात दु:खाचे वातावरण

बीड , (दिव्य न्युज):– जिल्ह्यातील शिक्षण विभागात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या मोठ्या आर्थिक घोटाळ्याला अखेर मोठी कलाटणी मिळाली आहे. शिक्षकांच्या संच मान्यता मागील तारखांनी देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केल्याच्या आरोपांमुळे दोन्ही प्राथमिक आणि माध्यमिक चे शिक्षणाधिकारी यांना आज निलंबित करण्यात आले. या कृतीनंतर संपूर्ण शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्यावर शिक्षकांना संच मान्यता देताना अनियमितता केल्याचा आणि त्यासाठी आर्थिक व्यवहार केल्याचा गंभीर आरोप होता. या प्रकरणाशी संबंधित काही पान २ वर



## भाजपच्या माध्यमातून एमआयएमला चांगले फटके देऊ आणि विजय मिळवू

बीड , (दिव्य न्युज):–बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत एमआयएम नेहमीप्रमाणेच धर्माच्या नावावर राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे, पण विकासाच्या मुद्द्यांवर त्यांची भूमिका नसते. आम्ही ▸▸ पान २ वर

**बीडमध्ये धार्मिक घोषणाबाजीनंतर डॉ.योगेश क्षीरसागर यांचा इशारा**



## स्वस्त विमानतिकिटांच्या आमिषाने २५ लाखांची फसवणूक

### आरोपी लोणावळ्यातून जेरबंद

बीड, (दिव्य न्युज):– शहरातील तक्रारदाराला स्वस्तात विमानतिकिटे काढून देण्याचे आमिष दाखवून तब्बल २५ लाखांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला बीड शहर डीबी पथकाने लोणावळ्यातून अटक केली. या प्रकरणी बीड शहर पोलीस ▸▸ पान २ वर



# घडीने दिलेला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भ्रष्टाचारी?

## पप्पू कागदेंनी फक्त पारवेंनाच का टार्गेट केलं?

## डॉ.ज्योती घुंबरे विषयी ब शब्दही काढला नाही

## ही कोणाची तरी स्क्रीप्ट तर नाही ना? जनतेच चर्चा

# येणाऱ्या निवडणूकीत पंडितांना धडा शिकविणार

# लवकरच बैठक घेवून समाजाची भूमिका ठरणार



बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जवळपास रिपाइंचे पप्पू कागदे यांचे तिकिट फायनल झाले होते परंतु ऐनवेळी त्यांना डावलून त्यांच्या जागी प्रेमलता पारवे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. यानंतर पप्पू कागदे यांनी पत्रकार परिषद घेत काही धक्कादायक खुलासे केले आहेत. यामध्ये राष्ट्रवादीकडून देण्यात आलेला उमेदवार भ्रष्टाचारी, पारवे यांनी ५०० खा ५० खा यात त्या दोनवेळेस सस्पेन्ड झालेल्या असल्याचे मत माध्यमांशी बोलताना पप्पू कागदे यांनी व्यक्त केले. यासह येणाऱ्या निवडणूकांमध्ये अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित यांना धडा शिकविणार असल्याचे मतही यावेळी पप्पू कागदे यांनी बोलून दाखविले. तसेच अजित पवार यांच्या



## अजित पवारांच्या दबावामुळेच पोलिसांची मला नोटीस

दबावामुळे मला पोलीसांकडून नोटीस आल्याचेसुद्धा ते म्हणाले परंतु या नोटीसला मी भिक घालत नाही असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी आंबेडकरवादी चळवळीचे अनेक पदाधिकारी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. येणाऱ्या २५-२६ तारखेला समाजाची बैठक होणार असून या बैठकीत काय निर्णय होईल तो नंतर जाहीर केला जाईल असेही ते यावेळी म्हणाले.

सध्या निवडणूकांची रणधुमाळी सुरू असून बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेच्या निवडणूका पार पडत आहेत. यात बीड नगरपालिकेच्या निवडणूकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. बीड निवडणूकीमध्ये अजित पवार यांनी ही निवडणूक अस्तित्वाची केल्याचे पहायला मिळत आहे. ऐनवेळेला ५२ उमेदवारांचा पॅनल उभा करून राष्ट्रवादीकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. कोणत्याही परिस्थितीत नगरपालिका आपल्या ताब्यात आणण्यासाठी सगळी टिम तयारीला लागल्याचे बोलले जात आहे. सुरुवातीला राष्ट्रवादीकडून रिपाइंचे पप्पू कागदे यांना उमेदवारी जवळपास जाहीर होती परंतु ऐवेळेस त्यांच्याजागी प्रेमलता पारवे यांना उमेदवारी देण्यात आली. यामुळे पप्पू कागदे यांनी आज पत्रकार परिषद घेत अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. एक्या मुस्लिमने ठेवलेल्या किंवा लग्न केलेल्यांना तिकिट दिले, ओरिजनल एससीला डावलले. शेख मुजीबच्या पत्नीच्या आईला तिकिट देण्यात आले यामुळे राष्ट्रवादीने एससी समाजाला डावलले यासह तिकिट वाटपामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाला, नगरपालिका यांना वेगळ्या कामासाठी ताब्यात घ्यायची आहे, भ्रष्टाचारासाठी घ्यायची आहे, आमच्यासारख्या चळवळीतील कार्यकर्त्यांना तिकिट दिले असते तर त्यांना हे करता आले नसते यामुळे मला डावलले असे अनेक आरोप पत्रकार परिषदेत पप्पू कागदे यांनी केले आहेत.

पान ४ वरून

## आ.सुरेश धस

` कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार महावितरणकडून त्वरीत निर्णय घेत बुधवार, १९ नोव्हेंबरपासून अमळनेर परिसरात दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती उपअभियंता ए. एन. शेख यांनी दिली. नवीन वेळापत्रकानुसार अमळनेर फिडर सकाळी ६ ते १२ आणि हातोला फिडर दुपारी १२ ते ६ अशी वेळ निश्चित झाली आहे. या निर्णयामुळे दहा-पंधरा गावांतील शेतकऱ्यांना बिबट्याच्या भीतीतून मोठा दिलासा मिळाला असून कोतनचे सरपंच महेश खेंगरे व शेतकरी कोमखले यांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि माऊली आप्पा जरांगे यांचे मनापासून आभार मानले आहेत.

## प्रभाग क्र.१९

मोठी संख्या या प्रभागात आहे नेहमी प्रत्येकाच्या सुख दुखात येणारे म्हणून सोफियान यांची ओळख आहे. काँग्रसेचे नेते खा.रजणीताई पाटील माजी मंत्री अशोक पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष इलियास टेलर, तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, शहरअध्यक्ष कुरेशी, यांनी शेख फिरदोस सोफियान यांना प्रचंड मतानी विजय करण्याचे आवाहन मतदारांना केले आहे.

## वॉर्ड क्र. ३- मधून

स्थानिक प्रश्न, स्वच्छ प्रशासन आणि विकासकामांना गती देण्याची हमी देत त्यांनी आगामी निवडणुकीत मतदारांचा विश्वास जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. वॉर्डातील दैनंदिन समस्या, पाणीपुरवठा, रस्ते सुधारणा, वस्तीतील मूलभूत सुविधा यासाठी ठोस धोरण राबवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी बोलून दाखवला. अर्ज दाखल झाल्याने वॉर्ड ३- मधील निवडणुकीत चुरस निर्माण झाली असून नागरिकांमध्ये याबाबत उत्सुकता दिसून येत आहे.

## धारूर नगरपरिषद

चुकीची माहिती, आणि विविध तांत्रिक चुका यांसारख्या कारणांमुळे ३६ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. या मोठ्या संख्येमुळे अनेक प्रभागांमध्ये राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे चित्र आहे.वॉर्ड क्रमांक १ मध्ये एमआयएम कडून मजबूत तयारी सुरू होती. या वॉर्डात -खचखच् ला चांगला जनाधार असल्याने पक्षाच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष होते. मात्र, छाननी दरम्यान एमआयएम् उमेदवाराच्या फॉर्ममध्ये तांत्रिक विसंगती, अपूर्ण दस्तऐवज आणि माहितीतील चुका आढळल्याने त्यांचा अर्ज सरळ अपात्र ठरविण्यात आला. या निर्णयामुळे एमआयएम् कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.वॉर्ड क्रमांक १० मध्ये भाजपकडून स्पर्धा अधिक तीव्र होणार अशी अपेक्षा होती. मात्र छाननीदरम्यान संबंधित भाजपा उमेदवाराच्या कागदपत्रांमध्ये गंभीर विसंगती आणि त्रुटी आढळल्याने त्यांचा अर्जही अवैध ठरविण्यात आला. या निर्णयानंतर वॉर्ड १० मधील राजकीय स्थिती अचानक बदलली असून स्थानिक पातळीवर नव्या चर्चांना उधाण आले आहे.अध्यक्षपदाचे चार अर्ज आणि नगरसेवक पदाचे ३६ अर्ज बाद झाल्यानंतर संपूर्ण धारूर शहरात निवडणुकीचे वातावरण आणखी तापले आहे. वॉर्ड १ मधील एमआयएम आणि वॉर्ड १० मधील भाजप उमेदवार अपात्र ठरल्यानंतर दोन्ही पक्षांच्या रणनीतीवर मोठा परिणाम झाला आहे. आता अंतिम लढत कोणत्या पद्धतीने आकार घेईल याकडे समस्त धारूरवासियांचे लक्ष लागले आहे. धारूरमध्ये यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची राहणार हे स्पष्ट झाले असून आगामी दिवसांत राजकीय हालचाली अधिक वेग घेणार आहेत.

## जिंतुर नगरपरिषद

माणिकरावजी भांबळे ह्या दोघाच्या उमेदवार मध्ये होणार आहे तर तीसरा पर्याय म्हणून इंडीयन कॉग्रेस पक्ष हा सुद्धा रिंगणात उतरला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने माजी नगरध्यक्ष प्रताप देशमुख तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या वतीने माजी नगरध्यक्षा सबिया कपील फारूखी या दोघात अतीतटीचा सामना होणार आहे तसेच तीसरा उमेदवार माजी नगरसेवक शेख ईस्माईल शेख सलीम इंडीयन कांग्रेस पक्षाच्या वतीने आपले नशिब अजमावित आहे. शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने सौ सुरेखा लक्ष्मीकांत टाले, तर स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या शिंदेगट शिवसेना च्या वतीने श्री राजेश सुधाकर वट्टमवार हे उभे आहे तर बहुजन समाज पार्टी व अपक्ष असे मिळून नऊ उमेदवार रिंगात आहेत . नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख २१ नोव्हेंबर रोजी असून त्या नंतरच खरे चित्र स्पष्टपणे दिसून येईल. निवडणूका शांततेत पार पडाव्यात या साठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा एसडीएम श्री शैलेश लाहोटी, तहसिलदार श्री राजेश सरोदे, मुख्यअधिकारी श्री उमेश ढाकणे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, मंडळ अधिकारी पठाण, सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री जिवन बेनिवाल, श्री गजेंद्र सरोदे पोलोस निरीक्षक, हे शहरात कोठेही आंचरसंहिता चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेत आहे.

पान १ वरून

## फाईट होणार ताईट,

तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. या तिन्ही पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर काल दि. १८ नोव्हेंबर रोजी या अर्जाची छाणणी झाली. या छाणणीत भाजपाच्या डॉ. ज्योती घुमरे, घड्याळाच्या प्रेमलता पारवे तर तुतारीच्या स्मिता वाघमारे यांचे अर्ज वैध ठरले आहेत. तिन्ही उमेदवार तगडे असल्याने या तिघांमध्ये फाईट ताईट होणार असल्याचे दिसत आहे.

## छाननी झाली,

पदाच्या विजेत्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल. निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसे शहरातील राजकीय वातावरण तापत चालले असून विविध प्रभागांत जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. पक्षांमध्ये मनधरणी, चर्चासत्रे आणि रणनीती आखण्याचे सत्र वेगात सुरू असल्याने आगामी काही दिवस बीडच्या राजकारणात चांगलीच रंगत आणणार आहेत.

## माध्यमिकचे

## शिक्षणाधिकारी

ऑडिओ क्लिप्सही व्हायरल झाल्या होत्या. या क्लिपमध्ये आम्ही एसआयटी मॅनेज केली अशा प्रकारचे दावे हे अधिकारी करत असल्याचा आरोप असून, त्यामुळे या प्रकरणाची विश्वसनीयता अधिकच वाढली होती.

तक्रारी आणि प्राथमिक तपासानंतर शिक्षण खात्याने दोन्ही अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे बीडच्या शिक्षण विभागात खळबळ उडाली असून शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील विविध संघटनांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. पुढील तपास सुरू असून संबंधित ऑडिओ क्लिप्सचीही स्वतंत्र चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

## स्वस्त विमानतिकिटांच्या

ठाण्यात गुन्हा नोंद आहे.

तक्रारदार अण्णासाहेब गोटीराम राठोड यांचा मुलगा विदेशात शिक्षण घेत असून, त्याच्या येण्या-जाण्यासाठी स्वस्तात विमानतिकिटे मिळवून देतो अशी खात्री आरोपीने तक्रारदाराला दिली होती. या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने २५ लाखांची रक्कम घेतली आणि नंतर फरार झाला.गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीचा माग काढणे कठीण जात होते. मात्र बीड शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने तांत्रिक तपास, गुप्त माहिती व सततच्या प्रयत्नांच्या आधारे आरोपीचा ठावठिकाणा शोधला आणि लोणावळयातून अटक करण्यात यश मिळवले.

कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, गहिनाथ बावनकर व राम पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

नागरिकांनी स्वस्त विमानतिकिटे, परदेशात नोकरी, किंवा मोठा माल स्वस्तात देण्याच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. मोठी आर्थिक देवाणघेवाण करण्यापूर्वी व्यवहाराची खात्री करावी आणि फसवणुकीचा संशय आल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

## भाजपच्या माध्यमातून

यापूर्वीही एमआयएमला बीडमध्ये रोखले आहे. या निवडणुकीतही भाजपच्या माध्यमातून एमआयएमला चांगले फटके देऊ आणि विजय मिळवू

असा इशारा भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिला.

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज छाननीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.१८) बीडमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. नगरपरिषद कार्यालयासमोर विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले होते. याच दरम्यान कार्यालयाजवळून जात असताना एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी धार्मिक घोषणा दिल्या. याबाबत डॉ.योगेश क्षीरसागर हे माध्यमांशी बोलत होते. पुढे ते म्हणाले, मी फक्त रस्ता क्रॉस करत होतो, त्यावेळी एमआयएमचे कार्यकर्ते अचानक धार्मिक घोषणा देऊ लागले. आमच्या कार्यकर्त्यांना चिथावणी देण्याचा स्पष्ट प्रयत्न होता. मात्र भाजप कार्यकर्त्यांनी त्यांना जशास तसे उत्तर दिले, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. दरम्यान, घटनास्थळी काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असले तरी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.